# महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,

फुटाळा तलाव मार्ग, नागपूर – 440 001

जा.क्र. मपमविवि/आस्था/विधी/ 789/2022 दि. 18 /08/2022

**महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठासाठी कंत्राटी पध्दतीने "विधी अधिकारी तथा सल्लागार" नियुक्त करणेबाबत जाहिरात**

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ येथील विधी विभागात, विद्यापीठ तसेच घटक महाविद्यालये/प्रक्षेत्रे यांसाठी मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद, नागपूर तसेच विविध औद्योगिक /कामगार/दिवाणी न्यायालये/ग्राहक मंच येथे दाखल करणेत आलेल्या /येणाऱ्या / प्रलंबित असलेल्या न्यायालयीन प्रकरणामध्ये विद्यापीठाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी परिच्छेद निहाय जबाब/उत्तर तयार करुन विद्यापीठ विधिज्ञास सोपविणेकरीता व न्यायालयीन प्रकरणांचा तातडीने निपटारा होण्यास मदत व्हावी तसेच विद्यापीठातील विविध विभागीय चौकशीच्या अनुषंगाने प्रशासकीय कार्यवाहीबाबतची प्रकरणे निकाली काढण्यास्तव विधी विभागात एका विधी अधिकारी तथा सल्लागार अत्यंत आवश्यकता आहे.

तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 च्या कलम 79 मध्ये नमुद केल्याप्रमाणे विधी अधिकारी तथा सल्लागार हा तक्रार समिती (Grievances Committee) चा सचिव म्हणून संपुर्ण जबाबदारी पार पाडण्याकरिता विधी अधिकारी तथा सल्लागार नियुक्त करण्याचे क्रमप्राप्त आहे.

करिता, विधी अधिकारी तथा सल्लागार नियुक्त करणेबाबतची बाब विद्यापीठाच्या विचाराधीन असून खालील अटीचे अधीन राहून अर्ज मागविणेत येत आहेत. अर्ज दाखल करणेची अंतिम तारीख <u>30/08/2022</u> पर्यत राहिल. सदरचे अर्ज सार्वजनिक सुट्टी व रविवार खेरीज कार्यालयीन वेळेते स्विकारले जाईल.

| अक्र | पदनाम | एकत्रित अनुज्ञेय मानधन दरमहा (दुरध्वनी व वाहन भत्ता मिळुन) |
|---|---|---|
| 1 | विधी अधिकारी तथा सल्लागार | एकुण मानधन रु. 30,000/– |

**अ) शैक्षणिक अर्हता व अनुभव :**

1) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा **कायद्याचा पदवीधर व** सनदधारक असेल
2) विधी अधिकारी तथा सल्लागारया पदासाठी वकीली व्यवसायाचा किमान 10 वर्षाचा अनुभव आवश्यक राहील
3) उमेदवार महसूल विषयक, सेवाविषयक, विद्यापीठाविषयक प्रशासनिक मालमत्ता विषयक अशा सर्व प्रकरणातील कायद्याच्या बाबी तथा विभागीय चौकशी इ. बाबत ज्ञानसंपन्न असेल ज्यामुळे तो कायदेविषयक कार्यवाही सक्षमतेने पार पाडू शकेल.
4) उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषेवर प्रभुत्व असणे आवश्यक आहे.
5) विधी अधिकारी तथा सल्लागार करीता उमेदवाराचे वय नियुक्तीवेळी 50 वर्षापेक्षा जास्त नसेल

**ब) सर्वसाधारण अटी :**

1) विधी अधिकारी तथा सल्लागार नेमणुक प्रथमतः 11 महिन्यासाठी (एकत्रित दरमहा मानधन रु. 30,000/— दुरध्वनी व वाहन भत्ता मिळुन) करार व कंत्राटी पध्दतीने ठोक रक्कमेवर करणेत येईल.
2) विधी अधिकारी तथा सल्लागार नेमणूक ही पूर्णतः कंत्राटी पध्दतीने असेल व ते विद्यापीठ कर्मचारी म्हणून गणले जाणार नाहीत.
3) अकरा महिन्यांनंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी वाढवता येईल. तथापि, अशा प्रकारे जास्तीत जास्त 3 वेळा नियुक्ती केली जाईल.
4) निवड झालेल्या उमेदवारांने विहित प्रपत्रात करार करुन देणे बंधनकारक राहील.
5) करारपध्दतीने नियुक्त केलेल्या विधी अधिकारी तथा सल्लागार एकत्रित मानधन (दुरध्वनी व वाहन भत्ता मिळुन) इ. व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाही.

**क) आवश्यक सुचना :**

1) अर्जामध्ये उमेदवाराने संपूर्ण नांव, पत्रव्यवहाराचा पत्ता, जन्मतारीख, वय, शैक्षणिक अर्हतेबाबतचा संपूर्ण तपशिल (टक्केवारीसह), कामाचा अनुभव असल्यास त्याबाबत तपशिल वकीली व्यवसाय करण्याबाबतचे नोंदणी प्रमाणपत्र इत्यादी माहिती नमूद करणे आवश्यक आहे. अपूर्ण माहिती भरलेले अर्ज अपात्र ठरविणेत येतील.
2) अर्जदारांने विहित नमुन्यातील अर्ज भरुन बंद लखोटयातून खालील पत्त्यावर पाठविणे आवश्यक आहे.
3) अर्जदाराने अर्जासोबत पुराव्याच्या कागदपत्रांच्या सांक्षाकित प्रति जोडणे आवश्यक आहे. मुळ प्रति जोडू नयेत.
4) वयाकरिता जन्मतारखेचा दाखला/माध्यमिक शाळा **प्रमाणपत्र/शाळा** सोडल्याच्या दाखल्याची साक्षाकिंत प्रत जोडणे आवश्यक आहे.

5) उमेदवारांनी आपले अर्ज समक्ष किंवा पोष्टाद्वारे खालील पत्त्यावर दि. 30/08/2022 रोजी सायंकाळी 5.30 वाजेपर्यंत पोहोचतील अशा बेतानेच पाठवावेत. त्यानंतर पोष्टाद्वारे वा अन्य प्रकारे प्राप्त होणाऱ्या अर्जाची अथवा त्यासंबंधी कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही. तसेच दिलेल्या पत्त्याव्यतिरिक्त अन्य ठिकाणी प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

6) उमेदवाराने विहित नमुन्यात अर्जावर विहित ठिकाणी अलीकडील काळात काढलेला एक पासपोर्ट साईजचा फोटो लावावा व फोटो स्वाक्षांकीत करावा.

7) अर्जामध्ये नमुद केलेली महिती चुकिची अथवा खोटी आढळून असल्यास संबंधित उमेदवार दंडात्मक कारवाईस पात्र राहिल. तसेच चुकिच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास तात्काळ कंत्राटी सेवेतून काढून टाकण्यास पात्र राहिल.

8) उमेदवारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी झाल्यानंतर, मुलाखतीसाठी पात्र झालेल्या उमेदवारांची यादी www.mafsu.in या वेबसाईटवर प्रसिध्द करणेत येईल. पात्र उमेदवारांची विद्यापीठ निवड समितीमार्फत मुलाखत घेण्यात येईल. मुलाखतीमध्ये गुणानुक्रमे निवड झालेल्या प्रथम उमेदवाराची नियुक्ती विधी अधिकारी तथा सल्लागार म्हणून करणेत येईल.

9) अर्ज पाठविण्याचा पत्ता – **कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, फुटाळा तलाव मार्ग, नागपूर –01** व लखोटयावर विधी सल्लागारासाठी अर्ज असे लिहावे.

10) उमेदवारांना अर्जामध्ये आपला कार्यरत मोबाईल क्रमांक व ई–मेल आयडी नमुद करणे अत्यावश्यक आहे.

11) नियुक्ती करिता कोणत्याही प्रकारे दबाव आणल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

नागपूर
दि. 18/08/2022

(सचिन कलंत्रे)
**कुलसचिव**
**महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,**
**नागपूर**

Form No "I"

(Proforma of the Application for the appointment of Legal Officer and Advisor)

| Photograph |
|---|

1. Post Applied for :-
2. Full Name of the Applicant :-
   (Starting with Surname)
   Father's/Husband's Name :-
3. Residential Address :-

| **Permanent Address** | **Temporary Address** |
|---|---|
| Room/Flat/Bldg.No. | Room/Flat/Bldg.No. |
| Village /Post | Village /Post |
| Taluka | Taluka |
| Road | Road |
| District /City | District /City |
| State | State |
| Pin | Pin |
| Mobile No- **(Essential)-** | Email **(Essential)-** |

4. (a) Date of Birth :-
   (b) Age on the date of Application :-
5. Place of Birth :-
6. Whether Candidate is Domiciled in State of Maharashtra :-

(a) whether enrolled as Member of the Bar Council of Maharashtra and Goa. :- (specify the registration no & date)

7. Educational Qualifications :-

(details of the examinations passed from S.S.C./H.S.C)

| Name of the examination | Name of University/ Board/ Institution | Subjects | Class | Year of Passing |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(a) Total number of years of practice :-

| Name of the courts where practiced | Total no of civil matters conducted | Total no of Criminal matters conducted | Total no of Service matters conducted |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

(b) Empanelled in any other institutions:-

8. Previous employment if, any :-

| Post held | Date of joining | Date of leaving | Reasons for |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

9. Languages known :-

(Read ..................., ..................., ..................., ...................)

(Write ..................., ..................., ..................., ...................)

(Speak ..................., ..................., ..................., ...................)

10. Whether the Applicant is involved in any criminal offence (to specify the details of offence), If so, whether convicted/ acquitted. :-

## DECLARATION

I ............................................................................, do hereby state that whatever is stated hereinabove is true and correct to the best of my knowledge and belief and if any information is found to be false and incorrect, my appointment as Legal Consultant, if made, shall stand automatically cancelled and I shall be liable for further necessary action.

Date :-

Place :- / /2022 Signature of the applicant.

**N.B.**

1. Candidate shall append the required true copies of testimonials, certificates, and documents.
2. Canvassing in any form shall disqualify the Applicant.
3. The Applicant shall produce the Character Certificate from any two Senior Advocates/ Senior Counsels.
4. The Applicant shall affix his recent passport size photograph with his signature.